रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर

## शिष्यवृत्ती नोटीस २०२२-२०२३

दि.२२/०९/२०२२

### एस.सी./ एस.टी./ ओ.बी.सी./ एन.टी./एस.बी.सी./ अपंग विद्यार्थी /ओपन कॅटेगिरी

ज्युनिअर महाविद्यालयातील ११वी व १२वी वर्गातील सर्व शिष्यवृत्तीधारक व ओपन कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की **(इंग्लिश मेडीयम सोडून )** शिष्यवृत्ती अर्ज किंवा इतर फी सवलतीचा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी.

विद्यार्थ्यांस ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण आल्यास शिष्यवृत्ती विभागातून माहिती घ्यावी. **तसेच ऑनलाईन अर्ज भरल्यावर अर्जाचा ID & Passward लिहून आणावा तसेच स्वत: जवळ जपून ठेवावा.**

| | |
|---|---|
| १. | **विद्यार्थ्यांचे बँकेत खाते नसल्यास पोस्ट ऑफीसमध्येच खाते उघडावे** किंवा शक्य असल्यास फक्त बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेतच खाते उघडावे. अगोदर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्यास आधार कार्डच्या वेबसाईडवर आधार कार्ड बँक खात्याला लिंक असल्याची खात्री करुन घ्यावी. विद्यार्थ्याचे बँक खाते NPCI पोर्टलला लिंक नसल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. **बँक खाते NPCI ला लिंक नसल्यास बँकेत जाऊन खाते लिंक करुन घ्यावे व बँकेकडून खाते NPCI पोर्टलला लिंक होत नसल्यास लगेच जवळच्या कोणत्याही पोस्ट ऑफीसमध्ये जाऊन बँक खाते उघडून घ्यावे. कॉलेज वेबसाईटवरील सन २०२०-२१ मधील नोटीस नं. ४० पाहावी.** |
| २. | विद्यार्थ्यांनी स्वत:चे आधारकार्ड चालू असल्याची आधारच्या वेबसाइडवरुन खात्री करुन घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याजवळ स्वत:चे आधारकार्ड व डोमासाईल सर्टिफिकेट पाहिजे. सदर आधारकार्डला स्वत:चा मोबाईल नंबर व ईमेल आय.डी.लिंक करुन घ्यावे. तसेच सदर आधारकार्ड व मोबाईल नंबर स्वत:च्या बँक खात्याला लिंक असणे अनिवार्य आहे. या शिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती व शासनाने ठरवून दिलेल्या कोणत्याही योजनेचा ऑनलाईन अर्ज भरता येणार नाही. तसेच आधार कार्ड वरील स्वत:चे नाव व जन्म तारीख बरोबर असल्याची खात्री शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्या अगोदर करुन घ्यावी. |
| ३. | **तसेच १० वी नंतरचा डिप्लोमा किंवा अन्य व्यावसायिक कोर्स पूर्ण किंवा अर्धवट करुन आलेला असल्यास सदर विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप मिळणार नाही. तरी अशा संबंधीत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती विभागातून माहिती घेणे.** |
| ४. | एस.सी./ एस.टी./ ओ.बी.सी./ एन.टी./एस.बी.सी. कॅटेगिरीतील अनुदानित व विनाअनुदानित तुकडीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी स्वत:चा जातीचा दाखला अनिवार्य आहे. या शिवाय सदर विद्यार्थ्यास संबंधीत शिष्यवृत्तीचा अर्ज भरता येणार नाही. |
| ५. | एस.सी./ एस.टी./ ओ.बी.सी./ एन.टी./एस.बी.सी. कॅटेगिरीतील अनुदानित तुकडीतील ज्या विद्यार्थ्यांकडे स्वत:चा जातीचा दाखला नाही किंवा भविष्यात मिळणारच नसेल अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती विभागात चौकशी करुन कोणता अर्ज भरावा याची माहिती घ्यावी व पूर्तता करावी. जे विद्यार्थी पूर्तता करणार नाही अशा विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. |
| ६. | ११ वी व १२ वी सर्व विद्यार्थ्याकडे रेशनकार्ड हवे व सदर रेशन कार्डमध्ये विद्यार्थ्याचे नाव असणे अनिवार्य आहे. रेशनकार्डमध्ये नाव नसल्यास लवकरात लवकर पूर्तता करावी किंवा त्या संदर्भात काही अडचण असल्यास शिष्यवृत्ती विभागात चौकशी करावी. |
| ७. | **शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहे संबंधीत विद्यार्थ्यांनी पूर्तता करुन ठेवावी .** १. डोमासाईल सर्टिफिकेट (२) रेशन कार्ड (३) अल्प कुटुंबाबतचे प्रमाणपत्र (महाडीबीटी वेबसाईटवर दिलेले-साध्या कागदावर देणे) (४) या महाविद्यालयातील तसेच बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचा तसेच संबंधीत महाविद्यालयाच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. (५) आधारकार्ड (६) आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असलेला फॉर्म बँकेच्या सही शिक्क्यासह. (७) जातीचा दाखला. (८) सन २०२२-२३ ची प्रवेश पावती.(ओरिजनल प्रवेश पावती महाविद्यालयाकडून मिळविणे) (९) **वडीलांचा सन २०२१-२२ चा उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला ओरिजनल जोडावा.** (१०) ओ.बी.सी./ एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख ते ८ लाखांपर्यंत असेल अशा विद्यार्थ्यांना आपल्या फ्रि-शिप अर्जाबरोबर स्वत:चा **नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.**(११) दहावी व त्यापुढील पास, नापास, एटीकेटीसह सर्व गुणपत्रक (१२) शैक्षणिक गॅप असल्यास साध्या कागदावर गॅप सर्टीफिकेट एफेडेव्हीट करुन द्यावे लागेल. (१३) बँक पासबुक |
| ८. | वडील हयात नसल्यास आईच्या नावाचा उत्पन्नाचा दाखला जोडून वडीलांचा मृत्युचा दाखला जोडणे अनिवार्य आहे. तसेच आई-वडील विभक्त राहत असल्यास कोर्टाचे कागदपत्र आवश्यक किंवा कोर्टाचे कागदपत्र नसल्यास साध्या कागदावर एफेडेव्हीट करुन हमीपत्र द्यावे लागेल. |
| ९. | ओ.बी.सी./ एन.टी./एस.बी.सी. व ओपन कॅटेगिरीतील **अनुदानित (Grant) तुकडीतील** ज्या विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक असतील व त्यांचे उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने **STW** किंवा **PTW** सवलतीचा अर्ज भरुन द्यावा. |
| १० | अपंग विद्यार्थ्यांनी देखील अपंग शिष्यवृत्तीचा अर्ज ऑनलाईन भरुन सर्व कागदपत्रांबरोबर अपंगत्वाचा दाखला जोडून वेळापत्रकाप्रमाणे जमा करावा. |
| ११ | विद्यार्थी शासकीय वसतिगृहात राहत असल्यास शिष्यवृत्ती अर्जात वसतिगृहाची माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच शासकीय वसतिगृहाचे पत्र शिष्यवृत्ती अर्जाला जोडून द्यावे. तसेच महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृहाची माहिती भरुन वसतिगृहाच्या प्रवेश पावती शिष्यवृत्ती अर्जाला जोडून द्यावी. |
| १२ | बँक पासबुक झेरॉक्स |

I/C Principal
C.D.Jain College of Commerce
Shrirampur, Dist.Ahmednagar